# बिट्स पिलानी गोवा कॅम्पसमध्ये दुर्गा पूजा उत्सव उत्साहात

प्रतिनिधी
वास्को

सांकवाळ येथील बिट्स पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पसमध्ये श्री दुर्गा पूजा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. चार दिवसांच्या या उत्सवात महासप्तमी, महाअष्टमी, महानवमी व विजयादशमी साजरी करण्यात आली.

महाषष्ठीदिनी दुर्गा मातेच्या मूर्तीची विधीवत स्थापना करण्यात आली. दरररोज पूजा, प्रसाद वितरण, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमात कॅम्पसमधील मुलांसाठी वेषभूषा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, हस्तकलेच्या वस्तूंचे प्रदर्शन आणि कॅम्पसमधील विद्यार्थी व शिक्षकांतर्फे नृत्य, संगीत व वाद्यवृंदाचा कार्यक्रम पार पडला.

या उत्सवात महिलांसाठी पाककला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, बिहू नृत्य, एकेरी नृत्य, कर्नाटक व हिंदुस्थानी शास्त्रीय गायन, जिम्नेस्टिक व संगीत खुर्चीचा खेळ अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. संस्थेच्या सदस्यांनी यावेळी नाटक सादर केले.

नवमीच्या दिवशी बक्षिसवितरण समारंभात कॅम्पसचे संचालक प्रा. सुमन कुंडू यांच्याहस्ते सांस्कृतिक कार्यक्रमातील विजेत्या स्पर्धकांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. विजयादशमीदिनी दुर्गा मातेचा विसर्जन सोहळा पार पडला. खोलांत समुद्र किनाऱ्यावर मूर्तीचे विसर्जन करण्यात आले.

विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व बिट्स पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पस समुदायाच्या सदस्यांनी या उत्सवाचा आनंद घेतला.